## महापौर असतांना शिवसेना प्रमुखांनी दिलेला संदेश



# बाळासाहेब ठाकरे
**शिवसेना प्रमुख**

माझ्या प्रिय ठाणेकर बंधु-भगिनींनो,

आज शिवसेनेचा जो उत्कर्ष झाला आहे, शिवसेनेची जी घोडदौड चालू आहे त्या श्रेयाचे पहिले मानकरी ठाणेकरच आहेत ! ज्या ठाणेकरांनी शिवसेनेचा भगवा झेंडा प्रथमच ठाणे महानगरपालिकेवर फडकविला त्या ठाणेकरांना मी कधीच विसरू शकत नाही. आता निवडणूक जवळ आली आहे म्हणून मी हे बोलत नाही. मी सत्य तेच बोलतो. ठाण्याचे महापौर असलेल्या श्री.राजन विचारे यांनी अप्रतिम कारभार चालविला आहे. शहराची साफसफाई, पाणी व्यवस्था, रस्ते, बागबगीचे आणि इतर काही महत्त्वाच्या सुविधा ठाणेकरांना पुरविण्याचे प्रयत्न ते अगदी मनापासून आणि कसोशीने करीत आहेत. तसेच काही सांस्कृतिक कार्यक्रमही ठाणेकरांना ते देत असतात. काही लोक उगाचच आरडाओरड करीत असतात. पण तेच लोक कार्यक्रम पहायला सुद्धा येत असतात. ठाणे शहराच्या बाबतीत काही ठराविक वृत्तपत्रे खवचटपणाने लिहीतच असतात. असे काही वृत्तपत्रात छापून येताच मी महापौर श्री. राजन विचारेंना तत्काळ फोन करून खरा प्रकार काय आहे हे विचारतोच, ते तत्परतेने चौकशी करतात व मला खरा प्रकार काय आहे ते कळवितात. ठाणे मला एवढे प्रिय आहे की, वांद्रयात बसून मी ठाणे शहराची नेहमीच काळजी करीत असतो. शिवसेनेने दिलेले श्री.राजन विचारे हे एक चांगले महापौर म्हणून ठाणे शहराला लाभले आहेत. त्यांच्यासोबत सर्व नगरसेवक व आमदार श्री. एकनाथ शिंदे हे सुद्धा हातात हात घालून ठाणेकरांच्या सेवाकार्यात मग्न आहेत. श्री.राजन विचारे यांच्यासारख्या चांगल्या महापौराला अडीच वर्षाची लाभलेली कारकीर्द ही फारच कमी आहे. या अल्पावधीत सुद्धा त्यांनी ठाणेकरांची मनापासून आणि ‘विचार’ पूर्वक सेवा केली आहे.

महापौर श्री. राजन विचारे यांनी प्रसिद्ध केलेला कार्याचा अहवाल आपल्यासमोर आदरपूर्वक सादर करीत आहोत. त्याचा आपण मोठया मनाने स्वीकार करावा, ही नम्र विनंती.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**आपला नम्र,**

**( बाळ ठाकरे )**